# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# चांगला शोमरोनी




लेखक: Edward Hughes
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus
रूपान्तरकार: Ruth Klassen; Sarah S.



60 गोष्टींतील 46 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi







तो मनुष्य म्हणाला, "देवावर आणि शेजाऱ्यांवर प्रीति कर." "परंतू माझा शेजारी कोण असा प्रतिप्रश्न त्याने केला."
3
त्या मनुष्याच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, येशूने एका माणसाची गोष्ट सांगितली, एक मनुष्य यरुशलेमेहून यरीहोस रस्त्याने जात होता.
या मनुष्यावर चोरांनी हल्ला केला.
4
त्याच्याजवळ जे काही मिळेल ते सर्व त्या चोरांनी चोरले, त्या अभागी प्रवाशाचे कपडे देखिल त्यांनी चोरुन नेले.
5
त्यांनी त्याला फार जखमी देखिल केले होते, आणि रस्त्याच्या कडेला अर्धमेला अवस्थेत टाकून ते निघून गेले.
6
योगायोगाने एक याजक त्याच वाटेने आला. त्या जखमी मनुष्याला तो निश्चितच मदत करेल.
7
नाही ! त्या रक्तबंबाळ मनुष्याला जेंव्हा त्याने पाहिले, तेव्हा तो रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने निघून गेला.
8


लवकरच चालणाऱ्या पायांच्या आवाजाने कोणीतरी दुसरा मनुष्य येत असल्याची चाहुल लागली. हा मनुष्य मंदिरात याजकाला मदत करणारा लेवी होता.
9


त्याने त्या जखमी अवस्थेतील मनुष्याला पाहिले आणि मग तो त्याला मदत न करताच निघून गेला.
10


अखेरिस, त्याच वाटेने शोमरोनी मनुष्य आला. यहुदी लोक शोमरोनी लोकांचा व्देष करित. शोमरोनी मनुष्य; गोष्टीतील नायक आहे याची, येशूची गोष्ट ऐकणाऱ्या लोकांनी अपेक्षा देखिल केली नसावी.
11


परंतु तो होता. शोमरोनी मनुष्य त्या जखमी मनुष्याला मदत करण्यासाठी तेथे थांबला.
12


शोमरोनी मनुष्य खाली वाकला, आणि हळूवारपणे त्याने अनोळखी मनुष्याच्या जखमांवर औषध लावून पट्टी बांधली. आणि मग त्याने त्या जखमी मनुष्याला त्याच्या स्वतःच्या गाढवावर बसण्यासाठी मदत केली.
13


वाटेतील एका उतारशाळेत, शोमरोनी मनुष्याने त्या जखमी मनुष्याची रात्रभर काळजी घेतली.
14













चांगला शोमरोनी

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

लूक १०

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!